# प्रेसनोट

जा.क्र. पोउआ/वाहतूक/ १२४०२/२०१८ पुणे शहर, दिनांक ०५/१२/२०१८

**विषय :- वाहतुक शाखेकडील वाहतुक विभागांकडून वाहतुक सुधारणा करीता विभागस्तरावर केलेल्या उपक्रमां बाबत.**

---

पुणे शहरातील वाहतूक सुरक्षित व सुरळीत चालण्यासाठी वाहतूक शाखेकडून नियमीत प्रयत्न करण्यात येत असून, वाहनचालकांकडून करण्यात येणा-या वाहतूक नियमभंगामुळेच अनेक लहान मोठे अपघात होत असल्याने वाहनचालकांना शिस्त लागून अपघाताचे प्रमाण कमी व्हावे याकरीता वाहतूक शाखेतर्फे वेळोवेळी विशेष मोहिम राबवून वाहतूक नियमभंग करणा-या वाहन चालकांवर कारवाई व प्रबोधन करण्यात येते.

पोलीस उप आयुक्त, वाहतुक श्रीमती तेजस्वी सातपुते यांचे मार्गदर्शन व सुचनांवरुन आज दिनांक-०५/१२/२०१८ रोजी,वाहतुक शाखेकडील फरासखाना, लष्कर, विमानतळ, हडपसर या वाहतुक विभागाकडून खालीलप्रमाणे उपक्रम/कारवाई करण्यात आली आहे.

हडपसर वाहतुक विभागाचे हद्दीत अण्णासाहेब मगर कॉलेज येथे पोलीस उप आयुक्त, वाहतुक श्रीमती तेजस्वी सातपुते यांचे उपस्थितीत महाविद्यालयातील विद्यार्थींना वाहनचालविताना घ्यावयाची काळजी,सुरक्षितता व वाहतुक नियम पालनाबाबत मार्गदर्शन केले तसेच सहभागी विद्यार्थी यांनी वाहनचालकांना फलक दाखवून व नियमांचे पत्रके वाटप करुन जनजागृती केली. तसेच सासवड रोडवर नवीन सिग्नल बसविण्यात आला असुन त्याचे उद्घाटन पोलीस उप आयुक्त, वाहतुक श्रीमती तेजस्वी सातपुते यांचे हस्ते करण्यात आले.

फरासखाना वाहतुक विभागाचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक- पत्की व स्टाफ यांनी आर सी. एम. गुजराथी हायस्कुल फडके हौद चौक पुणे येथे हायस्कुल मधील स्टाफ यांना व लष्कर वाहतुक विभागाचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक- देवरे व स्टाफ यांनी पुना कॉलेज येथे कॉलेजचा स्टाफ यांना हेल्मेट वापराबाबत प्रबोधन केले आहे.

तसेच विमानतळ वाहतुक विभागाचे प्रभारी अधिकारी जितेंद्र कोळी व स्टाफ यांनी,विमानतळ परिसरात ओला,उबेर चालकांकडून नो-पार्कींग व नो- हॉल्टींग मध्ये थांबणा-या १० वाहनांवर कारवाई करुन १२,०००/- रुपये दंड वसुल केला आहे. तसेच शिवाजीनगर वाहतुक विभागाचे प्रभारी अधिकारी शिंदे व स्टाफ यांनी वाहतुकीचे नियमभंग करणारे वाहनचालक यांचेवर महानगरपालिका अधिनियमानुसार माहे ऑक्टोबर ते ४ डिसेंबर २०१८ या कालावधीत ३०७ वाहनचालकांवर कारवाई करुन ४,८५,०००/- तडजोड रक्कम वसुल केली आहे. सदरची कारवाई ही नियमीतपणे करणार आहेत.

तरी वाहन चालकांना याद्वारे आवाहन करण्यात येते की, वाहतूकीच्या नियमांचे तंतोतंत पालन करुन शहरातील वाहतुक सुरळीत करण्यात योगदान द्यावे.


ANJUMAN KHAIRUL ISLAM'S
POONA COLLEGE OF ARTS, SCIENCE & COMMERCE
Y. & M. AKI's
Poona College of Arts,
Science and Commerce,
Camp, Pune - 411 001.


R.C.M.
R.C.M.
R.C.M.
REDMI NOTE 5 PRO
MI DUAL CAMERA